Lalita Gandbhir
4200 North Ocean Dr.
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com

# तीन ते चाळीस

दीपाच्या वाढदिवसाला मी तिला फॅन्सी म्हणजे महाग रेस्टॉरंटमध्ये नेण्याचा विचार करीत होते. तिच्या काही सोळा वर्षाच्या मैत्रिणीच्या वाढदिवसाला त्यांच्या आईवडिलांनी अशीच पार्टी दिली होती. दीपाला एक फॅन्सी रेस्टॉरंट ठाऊक होतं. तिथे व्हायोलिनवालाही असायचा. दीपाला खरं म्हणजे तिथे जायचं होतं. पण मी जेव्हा तिला, “तिथे तुला नेऊ का ?” म्हणून विचारलं तेव्हा तिने तोंड वाकडं केलं.

“मला तिथे जायचं आहे. पऽ ऽ ण... !” असं म्हणून ती क्षणभर थांबली.

“पण काय ?” मी विचारलं.

“डॅडीसुद्धा येणार का ?” दीपाचा प्रश्न.

“छान ! तुझ्या वाढदिवसाला तू डॅडीला नाही बोलावणार ?” मी विचारलं.

“पण डॅडीचे मॅनर्स ऽ ऽ !” दीपाने म्हटलं.

दीपाला काय म्हणायचं होतं ते मला आधीच कळलं होतं. ती तेरा चौदा वर्षाची झाल्यापासून तिला तर आमच्याबरोबर बाहेर जायची लाजच वाटू लागली होती. त्यातल्यात्यात रंजन - तिचा डॅडी - तर आणखीच नकोसा होता. त्याची वागणूक तिला पसंत पडत नसे.

“तू काय हवं ते कर.” मी जरा रागाने म्हणाले.

मग दीपाचा नाईलाज झाला. तिला रेस्टॉरंटमध्ये जायची तर फार इच्छा होती. डॅडीला नको येऊ कसं म्हणणार ? शेवटी आम्ही तिघांनी जाण्याचं तर ठरलं.

मी ‘हनीड्यू’ रेस्टॉरंटला रिझर्व्हेशनसाठी फोन केला. एका मंजुळ आवाजाने मला साडेसहाचं रिझर्व्हेशन करून दिलं. निघण्यापूर्वी रंजनला मी, “दीपाचा आज वाढदिवस आहे, नीट वाग. मोठ्यानं बोलू नकोस, तिला आज चिडवू नकोस. तिथे टाय लागतो.” इत्यादि पूर्वसूचना दिल्या. त्यावर त्याने, “असल्या ठिकाणी मला जायचंच नाही. नुसत्या ‘शो’ साठी पैसे...” वगैरे कुरकुर केली. पण जाण्याच्या दिवशी मुकाट्याने पांढरा शर्ट, स्पोर्ट जॅकेट, टाय इत्यादि जामानिमा केला. मी मनात हसले. कारण रंजन केवळ नाईलाजाने ऑफिसात जाताना सूट घालतो. एरवी अगदी साधे कपडे घालतो. पुष्कळदा शॉर्ट, टी शर्टमधे रहातो.

दीपाची, “डॅडी टाय लावेल की नाही ?” ही एक काळजी तर मिटली. तरीही तिने, “तू नेहमी असाच का रे व्यवस्थित रहात नाहीस ?” असा टोमणा मारलाच. रंजन त्यावर गप्प बसला. मी मनात म्हटलं “चला, पार्टीची नांदी तर ठीक झाली.

आम्ही रेस्टॉरंटमध्ये पोहोचताच आमची कार व्हॅलेने नेली. आणि बिलात मी पाच डॉलरस् वाढवले. रेस्टॉरंटच्या दरवाजावर जुन्या भारतीय देवळाप्रमाणे पितळी चकत्या लावल्या होत्या आणि भोवती नक्षी काढली होती. आत पाऊल टाकलं तर काही दिसेनाच. दिवे अगदी अंधूक होते. त्यामुळे मी उजव्या हाताकडच्या कॅशिअरच्या काउंटरवर आपटले. त्याचा धाडकन आवाज झाला. त्या अंधारातसुद्धा दीपाचे वटारलेले डोळे मला दिसले. थोड्या वेळाने दिसायला लागलं, आम्ही आत आलो, त्या दालनात काउंटर आणि कोट-रॅक होता. आत दुसरा नक्षीचा दरवाजा होता. त्यातून आतलं एक भव्य दालन दिसत होतं.

त्या दालनात मध्ये कारंजं होतं. त्या पाण्यात रंगीबेरंगी मासे होते. पाण्यात दिव्यांचा झोत सोडलेला होता. कारंज्याभोवती षटकोनात बीड्सचे पडदे सोडले होते. प्रत्येक पडद्यामागे चार टेबलं ठेवून रेस्टॉरंटचे सहा भाग केले होते. टेबलांवर रंगीबेरंगी टेबलक्लॉथ घातले होते. वरती राजवाड्यात असतात तसले झुंबराचे मंद दिवे होते. त्या एकूण थाटावरून बिल किती होणार ह्याची मला कल्पना आली.

दिसायला लागल्यावर माझ्या लक्षात आलं की, रेस्टॉरंट मोकळंच आहे. एका टेबलावर एक जोडपं मेन्यू चाळवत बसलं होतं. तेव्हा मी आपटल्यामुळे आवाज झाल्याबद्दल वाईट वाटून घ्यायचं काही कारण नव्हतं. हे अर्थातच दीपाला. आम्हाला नाही. आम्हाला वाईट वाटतच नव्हतं.

माझ्याआधीच रंजन आत पोचला होता. त्याच्या मांजरासारख्या घाऱ्या डोळ्यांमुळे त्याला सर्वांआधी दिसू लागलं असावं. आतल्या दालनात पाउल टाकताच तिथे, ‘होस्टेससाठी थांबा’ अशी एक पाटी होती. त्या पाटीजवळ, अस्वस्थपणे इकडे तिकडे बघत रंजन उभा होता. वाघ सावजावर जसं लक्ष ठेवतो, तसं त्याच्यावर लक्ष ठेऊन दीपा उभी होती. रेस्टॉरंटच्या एका कोपऱ्यात एक झुलता दरवाजा होता. त्याच्या आतून ट्यूब लाईटचा प्रकाशझोत येत होता. ते बहुदा किचन असावं.

अकस्मात रंजनने त्या दरवाजाकडे झेप घेतली, दीपाने लगेच तशीच झेप घेऊन त्याचा हात पकडला. “डॅडी, कुठे चालला आहेस ?” खालचा ओठ दाताने दाबून शक्य तितक्या हळू आवाजात ती म्हणाली. “होस्टेसला शोधायला.” शोधाचे कारण उघडच होते. दीपाला रंजन असं काहीतरी करणार हा संशय होताच. म्हणून ती दबा धरून बसली होती. रंजनला वाट बघायला आवडत नाही. “किचनमधे जाऊ नको…” दीपा म्हणाली.

“मग काय जगबुडी येईपर्यंत थांबू ?”… रंजनचा प्रश्ण.

“बघ ममी ! मी तुला सांगितलं होतं.” रंजनच्या हातावरची पकड सैल न करता, माझ्याकडे वळून बघत दीपा म्हणाली.

दीपाच्या मते, ‘किचनमध्ये होस्टेसच्या शोधात जाणं’ हा ‘बॅड मॅनर्सचा कहर होता. आता हे सर्व काही रंजनच्या सहनशक्तीबाहेर पोहोचलं होतं. त्यानं आपला हात खेचायचा प्रयत्न केला. पण दीपाने त्याला दाद दिली नाही. खेचाखेचीत दोघं जवळच्या टेबलाला आपटली आणि दिशेसचा व खुर्च्यांचा आवाज झाला.

परिणामी होस्टेस झुलत्या दरवाजातून बाहेर आली. तात्काळ दीपाने रंजनचा हात सोडला आणि ती माझ्या शेजारी पाटीच्या अलीकडे (कायदेशीर सरहद्द) येऊन उभी राहिली. रंजन हात सोडण्याच्या पोझमधेच उभा होता. बहुदा होस्टेसला पाहून त्याची तशी परिस्थिती झाली असावी. आपला झगमगणारा लाल गाऊन सळसळवत आणि (आय शॅडोमुळे) चंदेरी पापण्या पिटपिटवत तिने विचारलं, “तुम्ही कितीजण आहात ?” … आता त्या बयेचं

गणित फार कच्चं असावं संपूर्ण दालनात पाच माणसं होती. किंवा कदाचित उजेडातून आल्यामुळे तिला दिसलं नसावं. रंजन काहीतरी विनोद करेल ह्या भीतीने मी भरकन् तिला, "आम्ही तिघं" म्हणून सांगितलं.

"माझ्यामागे या" म्हणत ती टेबलांमधून नागमोडी चालू लागली. तिच्यामागे मी, रंजन व दीपा अशी वरात पूर्ण वर्तुळात फिरून पुन्हा पाटीजवळच्याच एका टेबलापाशी आली. आम्हाला त्या रेस्टॉरंटचा थाट दाखवायला किंवा आपली चाल दाखवायला ती आम्हाला वर्तुळात घेऊन गेली असावी. रंजन भारल्यासारखा दोन पावलं पुढे गेला. पुन्हा एक चक्कर मारायची त्याची इच्छा होती असं मला वाटलं. होस्टेस थांबल्यावरही पुढे गेल्याच्या चुकीबद्दल दीपाला काही होस्टेससमोर रंजनला बोलता आलं नाही.

"बसा हं" म्हणत होस्टेसने खुर्च्या मागे ओढल्या आणि आमच्या हातात आपल्याकडच्या लग्नपत्रिकेप्रमाणे दिसणारे, लाल रंगाचे, गोंड्यानी बांधलेले, सोनेरी अक्षरात लिहिलेले मेन्यू दिले. "*Have a good evening*" म्हणत ती दरवाजामागे नाहीशी झाली.

एवढ्यात मला बाहेरच्या दालनातून कुणीतरी धाडकन आपटल्याचा आवाज ऐकायला आला. माझ्याप्रमाणे कुणीतरी त्या अंधूक प्रकाशातून येऊन काउंटरवर आपटलं होतं. काही क्षणानंतर आतल्या दालनात तीन-चार वर्षांची एक मुलगी अवतीर्ण झाली. आई-वडिलांपेक्षा तिला त्या अंधारात लवकर दिसायला लागलं होतं. 'होस्टेससाठी थांबा' या पाटीकडे पहात ती उभी राहिली. मागून एक-एक पाऊल संभाळून टाकत आई-वडील आले. (आता मलाही स्पष्ट दिसत होतं.) तिथल्या गहन शांततेचा भंग करीत त्या मुलीने विचारलं, "ममी, त्या पाटीवर काय लिहिलं आहे ?" तिच्या बापाचं बोट ओठावर गेलं. "शश्" तो म्हणाला. "होस्टेससाठी थांबा" आईनं सांगितलं. मग ती मुलगी एकदा या पायावर, एकदा त्या पायावर करत इकडे-तिकडे बघत उभी राहिली. झुलत्या दरवाजामागच्या हालचालीवरून होस्टेस तिथे असेल हा अंदाज तिने पण बांधला असावा. ती सुद्धा एकदम ट्यूबलाईटच्या दिशेने धावू लागली. बापाने तिला अर्ध्या वाटेत पकडली. त्याने तिला खेचत परत आणायचा प्रयत्न करीत विचारलं, "कुठे चालली आहेस ?"

"होस्टेसला शोधायला." तिने मोठ्या आवाजात जाहीर केलं. त्या आवाजामुळे होस्टेसदेवी स्वयंपाकघरातून उगवल्या.

मग तीच प्रश्नोत्तरे होऊन, तसंच नागमोडी वर्तुळात फिरून तिने ते त्रिकुट आमच्या शेजारच्याच टेबलावर बसवलं. नागमोडी चालताना त्या मुलीने, कारंज्याच्या पाण्यात हात घालायला आणि बीड्स् ओढायला दोन साईड-ट्रिप्स केल्यामुळे, "डॅडी, त्या मुलीत आणि तुझ्यात काहीही फरक नाही." हा टोमणा दीपाने मारलाच. होस्टेस गेल्यावर, "नीनाला आपण आणायला नको होतं." असं बापानं हळू आवाजात म्हटलेलं मला ऐकू आलं.

आम्ही मेन्यू बघायला लागलो. "डॅडी, तू काय ऑर्डर करणार ?" दीपानं विचारलं.

"लॉबस्टर.." रंजनने सांगितलं.

"तीच मला काळजी वाटत होती. तू लॉबस्टर नको ना खाऊस. लॉबस्टर खाताना पसारा होतो. बिब् लावावी लागते. माझ्या शाळेतलं नेमकं कोणी आलं आणि त्यांनी तुला असं बिब् लावून पाहिलं तर ?" दीपाने सरबत्ती केली. दीपा रंजनच्या लॉबस्टर खातानाच्या अवताराविषयी नर्व्हस असायची.

"छान ! म्हणजे मी घरी 'जिवंत उकडून खायचा नाही' म्हणून लॉबस्टर खाऊ शकत नाही आणि इथे पसारा होतो म्हणून खाऊ शकत नाही." रंजन उखडला. तो उखडला की त्याचा आवाज चढतो. वरच्या पट्टीतलं त्याचं

बोलणं ऐकून दीपा कावरीबावरी झाली. “श ऽ ऽ श् ! ओ. के. ऑर्डर युवर लॉबस्टर.” म्हणून तिने शरणागती पत्करली.

“आणि तू काय घेणार आहेस ?” मी दीपाला विचारलं.

“हॅम्बर्गर, फ्रेंच फ्राईज आणि शेक.” दीपा म्हणाली.

“मग आपण मॅकडॉनल्डमध्येच गेलो असतो. ह्या फॅन्सी रेस्टॉरंटमधे हॅम्बर्गर कसला खातेस ?” मी वैतागले.

“मला तेच आवडतं.” दीपाने हट्ट सोडला नाही.

शेजारच्या टेबलावर तेच चाललं होतं. बापानं विचारलं, “नीना, तुला काय पाहिजे आहे ?”

“स्पगेटी” नीनाने सांगितलं.

“स्पगेटी घेऊ नकोस. त्या लांब शेवया तुला नीट खाता येत नाहीत. अंगावर सांडतात. तुझ्या फ्रॉकला डाग पडतील. तुला बिब् बांधावी लागेल.” बाप म्हणत होता.

“मी स्पगेटीच खाणार.” नीनाने उभं राहून आपला निर्धार व्यक्त केला.

“श ऽ ऽ श् ! नीना, रेस्टॉरंटमधे उभी राहू नकोस. चांगलं दिसत नाही.” बापाने तिला दम भरला.

त्या मुलीची आणि जेमतेम पंचविशीच्या आसपासच्या बापाची मला दया आली. नीनाचे मॅनर्स बघायला होतं कोण ?” ती कशीही वागली तरी आम्हाला चालेल.” असं त्याला सांगावसं मला वाटलं. नाही म्हणायला दीपाच्या लक्षात, त्या छोट्या मुलीचे ‘बॅड मॅनर्स’ आले असणार !

“नीना, तू हॅम्बर्गर घे.” तिच्या आईने तिला सांगून पहिलं.

“मला स्पगेटीच पाहिजे.” ह्यावेळी उभं राहण्याऐवजी तिने आपला हात टेबलावर जोरात आपटून आपला निर्धार व्यक्त केला.

“मागच्या वेळेला तू स्पगेटीची प्लेटच जमिनीवर उलटी केली होतीस.” बापानं आठवण करून दिली.

“ती आज नाही सांडणार. इथे वाद नको. ती भोकाडच पसरेल” आईनं वाद संपवला. भोकाडाच्या भीतीने बाप गप्प बसला.

“ती मुलगी पाहिलीस का किती वाईट वागतेय !” दीपाला आता गप्प बसवेना.

“ती तीन वर्षाच्या मुलीसारखीच वागते आहे. एकदा तू लहानपणी आमच्याबरोबर रेस्टॉरंटमधे गेली होतीस तेव्हा सारखी किचनच्या दरवाजाकडे पहात होतीस. दर वेळेला कुणी बाहेर आलं की, “फू ऽ ऽ  ड, फू ऽ ऽ  ड” म्हणून टाळ्या वाजवत होतीस.” मी आठवण केली.

“…आणि पाहिलंस का ? मुलांनी काहीही केलं तरी आई-वडलांना पसंतच पडत नाही. मला तू हॅम्बर्गर खाऊ नको म्हणते आहेस तर तिची आई तिला हॅम्बर्गर खायचाच आग्रह करते आहे.” दीपाचा युक्तिवाद सुरु झाला.

मी दीपाशी वाद घालत बसले नाही कारण आपण सोळा वर्षे वयाच्या आणि नीना फक्त तीन वर्षाची हे ती सोईस्करपणे तात्पुरतं विसरली होती…

आता गर्दी वाढू लागली होती. ती झगमगणारी लाल बाई दरवाजात सर्वांच्या स्वागतासाठी उभी होती. लांब काळ्या केसाचा, पांढरा सॅटिनचा शर्ट आणि काळी पॅंट घातलेला गोरटेल्या रंगाचा एक व्हायोलिनवालाही प्रगट झाला होता. तो प्रत्येक टेबलाशेजारी व्हायोलिन वाजवून लोकांची करमणूक करत होता. तो आमच्या टेबलाजवळ

येऊ नये अशी मी प्रार्थना करीत होते. कारण रंजन त्या व्हायोलिन वादनाला साथ देणार ह्याची मला पूर्ण खात्री होती. दीपाला ते आवडणार नाही हेही मला पक्कं ठाऊक होतं. आपल्या ॲक्शनचा दुसऱ्यावर काय परिणाम होईल ह्याचा विचार रंजन तर कधीही आधी करत नाही. कित्येकदा परिणाम (उदाहरणार्थ : दीपा रडायला लागली) झाला तरी तो आपल्या वागण्याने झाला आहे हे त्याला कळत नाही. त्याच्या घरातल्या आणि बाहेरच्या वागण्यात फारसा फरक नाही. तो रस्त्याने चालताना मोठ्यांदा पाट्या वाचतो. 'फालतू जोक्स' मारतो आणि मोठ्यांदा हसतो. त्याच्या ह्या वागण्याचा दीपाला जाम वैताग येतो. रंजनला आळा घालायला मी असमर्थ आहे.

दीपा रेस्टॉरंटमधे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे, यातलं कुणी आपल्या मित्रमैत्रिणींपैकी तर नाही ना ह्या भितीने पहात होती... शेवटी आमची ऑर्डर, रंजनच्या बिब् सकट एकदाची आली. नीनाच्या बापाने तेवढ्यात सिगरेट ओढायला सुरवात केली. त्याचा धूर रंजनच्या तोंडावर येऊ लागला. आता रंजनचं डोकं फिरलं.

"मिस, मिस ऽ ऽ" मिसला रंजनने हाक मारली. मिस दोन-तीन टेबलं सोडून पलीकडे होती. प्रथम रंजनने सभ्य पट्टीचा आवाज वापरला. तो तिला ऐकू तरी गेला नाही किंवा तिने दुर्लक्ष केले.

"मिऽ ऽ स" रंजन आता सभ्य पट्टीच्या हद्दीवर होता. मिसने तरीही लक्ष दिले नाही. दीपाने मला डोळ्याने इशारे केले. टेबलाखालून मला आणि रंजनला पायाने ढोसलं.

"मिस ऽ ऽ ऽ !" रंजन उभं राहून असभ्य पट्टीच्या आवाजात ओरडला. दीपाने त्याला आता टेबलाखालून चक्क दोन लाथा मारल्या. आता मिसचाही नाईलाज झाला. "येस सर" म्हणत ती पुढे आली.

"तुमच्याकडे 'नो स्मोकिंग' सेक्शन नाही का ?" रंजनने विचारलं.

"एक मिनिट" म्हणत तिने होस्टेसला बोलावलं. मग ती नागमोडी बया आली. तिने डोळे पिटपिटवत, "आमच्याकडे फक्त 'नो स्मोकिंग टेबलं आहेत" असं सांगितलं. तिच्याकडे बघितल्यावर रंजन स्मोकिंग वगैरे वगैरे विसरला. खरं तर ती चक्क "नो स्मोकिंग सेक्शन नाही" म्हणूनच सांगत होती पण सौंदर्यापुढे शंभर गुन्हे माफ !

नीनाने रंजनला उभं राहताना पाहिलं होतं. थोड्या वेळापूर्वीच तिला उभं राहण्याबद्दल रागावून घ्यावं लागलं होतं. त्यामुळे तिने रंजनकडे बोट दाखवीत, खणखणीत आवाजात, "त्या माणसाचे मॅनर्स चांगले नाहीत. तो उभा राहिला होता." हे जाहीर केलं. तेवढ्यात तिच्या लक्षात रंजनने घातलेली बिब् आली. तेव्हा, "त्या माणसाने माझ्यासारखीच बिब् घातली आहे." अशीही दवंडी तिने पिटली.

दीपा खालचा ओठ दाबून धरून 'लेडीज रुमच्या दिशेने निघून गेली. ती परत आली तेव्हाच नेमका तो व्हायोलिनवाला आमच्या दिशेने आला. त्याने एक गाणं वाजवायला सुरवात केल्याबरोबर रंजनने आपली प्लेट बाजूला करून टेबलावर ताल धरला आणि व्हायोलिनवाल्याला साथ द्यायला सुरवात केली. व्हायोलिनवाला खुष झाला. आता नीनाचं लक्ष रंजनच्या तबल्याकडे गेलं. तिने टाळ्या वाजवून त्याला साथ द्यायचं ठरवलं. आधीच लोकांचं लक्ष व्हायोलिनवाल्याकडे होतं. त्यात रंजनचा तबला आणि नीनाच्या टाळ्या ह्यामुळे संपूर्ण रेस्टॉरंटमधले लोक आमच्या दोन टेबलांकडे वळून पाहू लागले. काही बायका, "हौ क्यु ऽऽ ट !" वगैरेही म्हणाल्या.

एव्हाना दीपाला धरणी दुभंगून आपल्याला पोटात घेईल तर बरं असं वाटत होतं. ती खालचा ओठ दाताखाली दाबून मला, "डॅडीचा तबला थांबव" म्हणून सांगत होती.... आणि तिकडे नीनाच्या आईवडिलांचा, "शऽ ऽ श" चा भडिमारा चालूच होता. नीनाने "शश्" हा शब्द 'ट्यून आऊट" केलेलाच होता.

शेवटी एकदाचा तो व्हायोलिनवाला (दीपाची सत्वपरिक्षा घेऊन) गेला. दीपा काही बोलणार एवढ्यात रंजन, "तू मला टेबलाखालून सारखी लाथा काय मारते आहेस ?" म्हणून ओरडला. आता मात्र दीपाच्या सहनशक्तीची सीमा संपली आणि गंगा-यमुना सुरु झाल्या. अशा वेळी गंभीर राहण्याऐवजी मला हसायलाच यायला लागलं. दीपाला रडताना आणि मला हसताना बघून रंजन जाम वैतागला. "आता हे काय ? एक रडतेय आणि एक हसतेय !" तो ओरडला.

"मी तुला सांगितलं होतं डॅडी कसा वागणार ते." दीपा मला म्हणाली.

"काय ही कटकट ?मी काय लहान बाळ आहे ? सारखी ही मला लाथा मारते. हे करू नको, अन् ते करू नको म्हणून सांगते." "रागाऊ नकोस. ती सोळा वर्षाच्या मुलीसारखीच वागते आहे." मी त्याला शांत करण्यासाठी म्हटलं. पण आता तो वैतागलेला होता.

"मी पंचवीस वर्षाची होईपर्यंत मी तिच्याबरोबर परत कधी असल्या रेस्टॉरंटमध्ये येणार नाही." त्याने आपला निश्चय जाहीर करून टाकला.

शेजारी नीनाची टकळी चालून होती. निघता निघता मला नीनाच्या बापाचं खालील वाक्य ऐकू आलं, "ही सोळा वर्षाची होईपर्यंत मी इथे परत येणार नाही."

पूर्वप्रसिद्धी एकता
समाप्त